# एक ठिपका



पीटर रेनॉल्ड्स




# एक ठिपका

पीटर रेनॉल्ड

चित्रकलेचा तास संपला होता,

पण वाश्ती अजूनही तिच्या खुर्चीवर बसूनच होती.

तिच्या समोरचा कागद कोरा होता.





वाश्तीच्या बाईंनी वाकून तो कोरा कागद पाहिला.
"आहा! बर्फाच्या वादळात सापडलेलं
ध्रुवीय अस्वल (पोलार-बेअर)!" त्या म्हणाल्या.

"आश्चर्यच आहे!" वाश्ती म्हणाली,
"पण मला तर चित्र काढता येत नाहीत."



बाई हसल्या.
"तू कागदावर फक्त एक ठिपका काढ
मग बघू त्याचं काय होतं ते.”



वाश्तीने आपलं मार्कर पेन घेतलं
आणि ते जोरात कागदावर आपटलं.
“हे घ्या.”



बाईंनी कागद उचलला

आणि नीट निरखून पाहिला.

“हं……”



मग त्यांनी परत तो कागद वाश्तीकडे सरकवला,

आणि शांतपणे म्हणाल्या,

"आता यावर तुझी सही कर.”

वाश्तीने क्षणभर विचार केला.

"मला चित्र काढायला नसेल जमत,

पण मला सही करायला येतेचं की.”



पुढच्या आठवड्यात वाश्ती जेव्हा चित्रकलेच्या तासाला गेली तेव्हा बाईंच्या टेबलावर लटकवलेलं चित्र बघून तिला खूप आश्चर्य वाटलं.

कारण त्यात होता
तिने काढलेला छोटा ठिपका - तिचा ठिपका!
तो सुद्धा सोनेरी फ्रेम मधे बसवलेला!





“हं ... मी याच्यापेक्षा सुंदर ठिपका
तर नक्कीच काढू शकते.”



वाश्तीने तिची आधी कधीच न
वापरलेली रंगांची पेटी उघडली,
आणि कामाला लागली.



वाश्ती एकामागोमाग एक ठिपके काढत राहिली.

एक पिवळा ठिपका.

एक हिरवा ठिपका.

एक लाल ठिपका.

एक निळा ठिपका.



निळा रंग लाल रंगात मिसळला.

तिला लक्षात आलं की आता ती

जांभळा ठिपकाही काढू शकते.

वाश्ती खूप वेगवेगळ्या रंगांचे

छोटे-छोटे ठिपके काढत राहिली.



"जर मी छोटे ठिपके काढू शकते,
तर मला मोठे ठिपकेही काढायला जमेल."

वाश्तीने एक मोठा ब्रश घेतला आणि
मोठ्या कागदावर मोठे-मोठे ठिपके काढले.

वाश्तीने एक मोठा ठिपका काढला,
पण तो रंगवला नाही.





काही आठवड्यांनंतर शाळेच्या चित्रकला प्रदर्शनात

वाश्तीच्या ठिपक्यांनी भरपूर शाबासकी मिळवली.

वाश्तीचं लक्ष तिच्याकडे कौतुकाने
पाहणाऱ्या छोट्या मुलाकडे गेलं.
“तुम्ही खूप मोठ्या कलाकार आहात.
मलाही चित्रकला आली असती तर!” तो म्हणाला.

"तुला नक्की जमेल,” वाश्ती म्हणाली.

"मला! नाही नाही.
मला तर पट्टीने सरळ रेष सुद्धा काढता येत नाही,"
मुलगा म्हणाला.



वाश्ती हसली.
तिने मुलाच्या हातात एक कोरा कागद दिला आणि म्हणाली,
"दाखव बरं!”

रेष काढताना मुलाची पेन्सिल कापत होती.





मुलाच्या वाकड्यातिकड्या रेषेकडे
वाश्तीने नीट निरखून पाहिलं.
आणि ती म्हणाली......

"आता यावर तुझी सही कर."



अंत